# शबरी आदिवासी घरकुल योजना

राज्यातील ज्या अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची घरे कुडा- मातीची आहेत किंवा अनुसूचित जमातीची जी कुटुंबे बेघर आहेत अशा अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेच्या धर्तीवर या विभागाच्या दिनांक २८.०३.२०१३ च्या शासन निर्णयान्वये सन २०१२-१३ पासून **"शबरी आदिवासी घरकुल योजना"** राबविण्यात येत आहे. सदर योजना ही १०० % राज्य पुरस्कृत आहे. आदिवासी उपयोजनेतंर्गत आदिवासी क्षेत्रातंर्गत येणा-या जिल्हयातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी तसेच आदिवासी बाहय क्षेत्रातील जिल्हयातील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना सदर योजनेअंतर्गत घराचे २६९.०० चौ.फूट. चटई क्षेत्र अनुज्ञेय आहे.

२. शबरी आदिवासी घरकुल योजना ही केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येते. विभागाच्या दि.०६.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत ग्रामीण भागाकरिता प्रती घरकुल अनुदान सर्वसाधारण क्षेत्रासाठी रु.१.२० लक्ष व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी रु.१.३० लक्ष (शौचालय बांधकामाव्यतिरिक्त) देण्यात येते. शौचालय बांधकामासाठी रु.१२,०००/- अनुदान हे स्वच्छ भारत अभियांनांतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत देण्यात येते.

३. या योजनेसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.१.२० लाख इतकी आहे. तसेच,पूर्वी निश्चित करण्यात आलेल्या प्राधान्यक्रमाबरोबरच शबरी घरकूल योजनेतंर्गत लाभ देताना आदिम जमाती व पारधी जमातीला प्राधान्याने लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

४. सन २०२३-२४ या वर्षासाठी शबरी आदिवासी घरकुल योजनेतंर्गत दि.०२.०६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये १,०७,०९९ व दि.१४.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये १४,०२६ एवढे असे एकूण १,२१,१२५ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून सन २०२३-२४ या वर्षासाठी रू.१२०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता रू.४५० कोटी निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

**भौतिक प्रगती (माहे मे, २०२४ अखेर पर्यंत)**

| अ.क्र. | वर्ष | उद्दिष्टे | मंजूर घरकुले | पूर्ण | प्रगतिपथावर |
|---|---|---|---|---|---|
| १ | **२०१६-१७** | २१०१५ | २१००३ | २०४५६ | ५४७ |
| २ | **२०१७-१८** | ११८०५ | ११४७० | १०८९४ | ५७६ |
| ३ | **२०१८-१९** | १२३२२ | १२२५८ | ११६५५ | ६०३ |
| ४ | **२०१९-२०** | ३८१५३ | ३७८७९ | ३४९६७ | २९१२ |
| ५ | **२०२०-२१** | - | ० | ० | ० |
| ६ | **२०२१-२२** | १८५४४ | १८१५४ | १४७३६ | ३४१८ |
| ७ | **२०२२-२३** | ९३२८८ | ७७२०५ | २६८८४ | ५०३२१ |
| ८ | **२०२३-२४** | १२११२५ | ५४३०४ | ४०८० | ५०२२४ |
| | **एकूण** | **३१६२५२** | **२३२२७३** | **१२३६७२** | **१०८६०१** |

**शबरी आदिवासी घरकुल योजनेतंर्गत लाभार्थ्यांची माहिती "**awassoft**" या ऑनलाईन प्रणालीवर उपलब्ध आहे.